# भारतीय राजकारणातील स्त्रियांचा सहभाग आणि स्त्री सक्षमीकरण

**शुभांगी सदाशिव माने** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर. ईमेल - shubhangimane1@gmail.com

---

**प्रस्तावना** :-

प्राचीन काळखंडापासून भारताच्या इतिहासात महिलांनी सामाजिक, धार्मिक ,आर्थिक ,सांस्कृतिक आणि राजाकिय क्षेत्रात महत्वपूर्ण योगदान दिल्याचे दिसून येते. ऋग्वेद काळात महिला राजकारणात अग्रेसर असल्याचे अनेक उल्लेख पाहावयास मिळतात त्यानंतर उपनिषद आणि पूराणकाळातही स्त्रियांची ही स्थिती कायम राहिल्याचे आढळून येते. परकीय आक्रमानानंतरही काही भारतीय स्त्रिया राजकारणात सक्रीय सहभागी झाल्याची उदाहरणे दिसतात. . मध्ययुगीन कालखंडात वयाच्या अवघ्या तेराव्या वर्षीच निष्णात लढवय्यी म्हणून नावलौकिक प्राप्त करत रझिया सुलतान हिने दिल्लीच्या गादीवर प्रथम महिला राज्यकर्ती म्हणून कार्य करण्याचा मान मिळवला इ. स . .१५२४ ते १५६४ या काळात गोंडवाना संस्थानाची महाराणी असलेल्या दुर्गावतीचे नावही इतिहासात कोरले गेले . त्याचप्रमाणे १६ व्या शतकातील चांदबिबी आणि १७ व्या शतकात प्रत्यक्ष राजकारण न करताही राजकारणाला एकूणच नवी दिशा देणारी राजमाता जिजाऊ ,करवीर निवासिनी रणरागिनी ताराबाई ,पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर ,कित्तूरची राणी चेनम्मा अशा अनेक स्त्रियांनी राज्यकारभार उत्तमरित्या चालविलला. त्यानंतर स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्रत्तोर काळखंडातही अनेक स्त्रियांनी आपल्या कार्यकर्तुत्वाचा ठसा राजकारणात उमटवला .

**उद्दिष्ट्ये** :-

१ ) महिलांच्या भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील सहभागाचा अभ्यास करणे .

२ ) स्वातंत्र्यत्तोर कालखंडातील महिलांच्या राजकीय योगदानाचा अभ्यास करणे .

३ ) महिलांच्या राजकीय सहभागातील वास्तविकतेचा अभ्यास करणे

**संशोधन पध्दती :-**

प्रस्तुत शोधानिबंधासाठी संशोधकाने दुय्यम संदर्भ साधनाचा म्हणजेच ग्रंथ मासिके लेख ,वृतपत्रे आणि इंटरनेट इत्यादी संदर्भ साधनाचा वापर केला आहे . संकलित माहितीची विश्वासर्हता तपासून वस्तूनिष्ठ पध्दतीने मांडणी करण्यात आली आहे .

महिलांचे राजकीय साक्षमीकरण म्हणजे काय ?

भारतीय संविधानामध्ये सर्व भारतीय स्त्रियांना समान अधिकार (कलम १४ ) देश व राज्याकडून होणाऱ्या भेदभावपासून संरक्षण (कलम १५ (१) समान संधी (कलम १६) समान कामासाठी समान वेतन (कलम ३९ (डी) याची हमी दिली आहे . तसेच स्त्रिया व मुले यांच्यासाठी विशेष कायदे करण्याचा अधिकार राज्यसरकारला देण्यात आला आहे “१ .

**स्वातंत्र्यचळवळीतील स्त्रियांचे राजकीय कार्य :-**

भारतातील स्वातंत्र्य लढ्यात केवळ पुरुषांनीच सहभाग घेतला असे नाही . तर अनेक शूर धाडसी आणि पराकमी स्त्रियांनी देशाच्या स्वातंत्र्य लढ्यात महत्वपूर्ण योगदान आणि बलिदानही दिले . बेगम हजरत महल ह्या अशा पहिल्या भारतीय महिला होत्या ज्यांनी १८५७ च्या उठावात सक्रीय सहभाग घेतला . भारतातील स्त्रियांनी केलेल्या बलिदानाला भारतीय इतिहासाच्या इतिहासात प्राथमिक स्थान आहे . १८५७ च्या उठावात राणी लक्ष्मीबाई बेगम हजरत महल आणि झाशीची राणी यासारख्या स्त्रियांनी आपले शौर्य आणि पराक्रम दाखवून ब्रिटिश सैन्याला कडवी झुंज दिली असल्याचे उल्लेख आढळून येतात .२० व्या शतकाच्या सुरवातीला भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस स्थापनेसोबतच स्त्रियांचा सकीय सहभाग वाढू लागला . यामध्ये पुरुषांच्या बरोबरीने अनेक स्त्रियांनी सहभाग घेतला . सरोजिनी नायडू ,अरुणा आसफ अली आणि कस्तुरबा गांधी यासारख्या स्त्रियांनी भाषणे निषेध मोर्चे आणि बहिष्कार चाळवळीमध्ये महत्वपूर्ण भूमिका पार पाडली . अनेक महिला कॉंग्रेस पदाधीकाऱ्या बनल्या आणि स्वातंत्र्यलढ्यासाठी रणनीती तयार करण्यात आणि अंमलात आणण्यात सहभागी झाल्या . अशाप्रकारे भारतीय स्वातंत्र्य लढ्यात आणि राजकारणात अनेक स्त्रियांनी योगदान दिले आणि त्यांच्यापैकी प्रत्येकजण आपल्या स्वत:च्या अद्वितीय मार्गाने प्रेरणादायी ठरल्या आहेत. ”२

स्वाांतंत्र्यत्तोर कालखंडातील महिलांचा राजकीय सहभाग :-

भारतीय राजकारणात महिलांनी महत्वाची भूमिका बजावली आहे. देशाच्या विकासात आणि प्रशासनात महिलांनी महत्वपूर्ण योगदान दिले आहे. १९४७ मध्ये भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारतीय राजकारणात महिलांची भूमिका लक्षणीयरित्या विकसित झाल्याचे दिसते . यापूर्वी राजकारणात महिलांचा सहभाग मर्यादित होता. कायदेमंडळामध्ये

त्यांचे प्रतिनिधित्व अल्प होते. तथापि मागील काही दशकापासून त्यामध्ये बदल घडून महिलांचा राजकीय सहभाग हळूहळू वाढत असल्याचे दिसते आहे. १९९२ मध्ये झालेल्या ७३ व ७४ च्या घटनादुरुस्तीने स्थानिक संस्थामध्ये महिलांसाठी विशिष्ट टक्केवारीची तरतूद केल्याने त्याचा परिणाम राजकारणात महिलांची संख्या वाढण्यावर झाला आहे..

भारताच्या पहिल्या आणि एकमेव महिला पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यासारख्या उल्लेखनीय महिला नेत्यानी राजकीय पटलावर अमिट छाप ऊमटवली . श्रीमती इंदिरा गांधी यांच्याप्रमाणेच आणखी काही प्रभावी महिला व्यक्तिमतवामध्ये अनेक महिलांचा समावेश होतो . त्यामध्ये श्रीमती जयललिता यांनी अनेक वेळा तमिळनाडूच्या मुख्यमंत्री म्हणून कार्य केले. राज्यातील गरीब आणि उपेक्षित समुदायाचे जीवनमान सुधारण्यासाठी विविध कल्याणकारी योजना (आनंद २०१४) हे त्यांच्या नेतृत्वाचे वैशिष्ट्य मानले जाते .

श्रीमती सुषमा स्वराज्य भारतीय जनता पक्षाच्या ( भाजप ) प्रमुख नेत्या होत्या. आणि २०१४ ते २०१९ पर्यन्त त्यांनी भारताच्या परराष्ट्र मंत्री म्हणून कार्य केले . त्यांच्या प्रभावी व्यक्तिमत्वाने त्यांनी भारताचे राजनैतिक संबंध मजबूत करण्याची महत्वपूर्ण भूमिका पार पाडली .

भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसच्या माजी अध्यक्षा सोनिया गांधी या अनेक दशकापासून भारतीय राजकारणात एक महत्वाची व्यक्ती म्हणून कार्यरत आहेत .पक्षाच्या धोरणांना आणि दिशांना आकार देण्यात त्यांचे नेतृत्व महत्वाचे ठरले आहे. सोनिया गांधीप्रमाणेच कॉंग्रेसच्या दिग्गच नेत्या शिला दीक्षित यांनी सलग तीन वेळा दिल्लीच्या मुख्यमंत्रीपदाची धुरा सांभाळली आहे. त्यांचे प्रशासकीय कौशल्य महत्वपूर्ण असून त्यांनी दिल्लीला आधुनिक महानगरात रूपांतरित करण्याची महत्वाची भूमिका पार पाडल्याचे दिसून येते. त्यांच्या काळात पायाभूत सुविधा आणि सुधारित नागरी सुविधांचा विकास घडून आल्याने भारतीय राजकारणात त्यांना आदरणीय व्यक्तिमत्व म्हणून पाहिले जाते.

त्याचप्रमाणे पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांचे उदाहरणही ज्वलंत आहे. त्यांची राजकीय कारकीर्द त्यांच्या तळागाळातील दृष्टीकोन आणि भारतीय राजकारणातील यथास्थितीला आव्हान देण्याच्या त्यांच्या प्रयत्नानी चिन्हांकित केली आहे. त्यांनी आखील भारतीय तृणमूल्य कॉंग्रेसची (टीएमजी) ची स्थापना करून राज्यात शिक्षण,आरोग्यसेवा आणि पायाभूत सुविधा सुधारण्यासाठी विविध उपक्रम राबविले आहेत उपेक्षित समुदायांना सक्षम बनवण्यासाठी आणि आर्थिक विकासाला चालना देण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले.आहेत "३

अशापद्धतीने स्वातंत्र्यत्तोंर काळखंडामध्ये शैक्षणिक विकास झाल्यामुळे शिक्षण घेऊन स्त्रियानी मोठ्या प्रमाणात राजकारणात सक्रिय सहभाग नोंदवल्याचे आढळून येते . तसेच स्त्री आरक्षण कायद्यामुळे ग्रामपंचायत,लोकसभा आणि विधानसभेच्या सर्वच निवडणुकांमध्ये स्त्रियानी बाजी मारत सरपंच पदापासून अगदी राष्ट्रपती पदापर्यंत मजल मारलेली आहे. त्यामुळेच सध्यस्थितीत भारत महिला राजकीय सक्षमीकरणाच्या दिशेने वाटचाल करत आहे.

**महिलांच्या अधिकाधिक राजकीय सहभागासाठी महिला आरक्षण कायदे :-**

भारतीय राज्यघटनेने अनुसूचित जाती आणि जमातीसाठी अनेक कायदे करून आरक्षण दिलेले असले तरी राज्यघटनेत स्त्रियांचा राजकीय सहभाग वाढावा यासाठी काही आरक्षण केलेले दिसत नाही. तथापि नंतरच्या कालखंडात कालपरत्वे राज्यघटनेमद्धे दुरुस्त्या करून स्त्रियांना अधिकाधिक राजकारणात सकीय करण्यासाठी आणि त्यांचा सहभाग वाढवण्यासाठी प्रयत्न केले गेले. त्याच कायद्यांचा आढावा थोडक्यात घेता येईल.

भारतातील १९९२ च्या ७३ व्या ७४ व्या घटनादुरुस्ती कायद्याद्वारे स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये म्हणजे नगरपालिका स्तरावर पंचायती मध्ये महिलांसाठी किमान एक तृतीयांश जागा राखीव ठेवण्याचा कायदा करण्यात आला तेंव्हापासून गेल्या तीन दशकामध्ये संसद आणि राज्याच्या विधानसभांमद्धे महिलांसाठी जागांच्या आरक्षणाच्या गरजेवर मोठ्या प्रमाणात विचार केला जात असल्याचे निदर्शनास येते.

गेल्या काही दशकामध्ये महिला खासदार आणि आमदारांची टक्केवारी तुलनेने वाढली असली तरी ती अनुक्रमे १५ टक्के आणि राज्य विधानसभेत १० टक्क्यांच्या आसपास राहिली आहे गेल्या काही वर्षामध्ये राजकीय अभ्यासक विश्लेषक आणि अहवाल यांनी भारतातील राष्ट्रीय आणि राज्यस्तरीय विधान संरक्षणामध्ये महिलांसाठी जागांच्या आरक्षणाची गरज अधिक बळकट केली आहे उदा- महिला राजकीय सक्षमीकरणासाठीचे राष्ट्रीय धोरण (२००१) आणि भारतातील महिलांच्या स्थितीवरील अहवाल (२०१५) यांनी संसद आणि राज्यांच्या विधानसभांमद्धे महिला आरक्षणाच्या गरजेवर भर दिला आहे.सन १९९६,१९९८,१९९९ आणि २००८ मध्ये महिलांच्या आरक्षणाची खात्री करण्यासाठी कायदा आणण्याचे प्रयत्न करण्यात आल्याचे आढळून येते . तसेच २०१० मध्ये लोकसभा आणि राज्याच्या विधानसभांमद्धे

महिला आरक्षणाचे विधेयक राज्यसभेत मंजूर करण्यात आले . तथापि लोकसंखेच्या मान्यतेअभावी ते पास होऊ शकले नाही " .

राष्ट्रीय आणि राज्य विधानमांडळातील महिला आरक्षण कायद्यामुळे भारतीय राजकारणात महिलांच्या सहभागाचा मार्ग मोकळा झाला आहे . त्यामुळे तळागाळातील अनेक महिलाना राजकारणात आपला राजकीय सहभाग नोंदवता येऊ लागला आहे "४ .

**भारतीय राजकारणात महिलांच्या सहभागावर परिणाम करणारे घटक :-**

आत्तापर्यंतच्या महिला राजकारणाचा इतिहास पहाता ,राजकारणात महिलांचा सहभाग कमी महत्वाचा राहिला आहे . त्या राजकारण्यांच्या निष्ठावंत मतदार ,समर्थक किंवा पत्नी म्हणून राहिल्या आहेत . श्रीमंत किंवा मजबूत राजकीय पार्श्वभूमी असलेल्या काही माहिलाच पुढे आल्या आणि राजकारणात सहभाग घेतला . अनेक कारणामुळे महिला पुढे येऊ शकल्या नाहीत . त्यामध्ये पुढील घटकांचा समावेश होतो .

1. रूढीवादी मन :-

राजकारणात दुर्दैवाने नेहमीच घाणेरडे मानले गेले आहे . आणि ते पुरुषांसाठी योग्य क्षेत्र मानले गेले आहे . या क्षेत्रासाठी कष्ट आणि ताकद आवश्यक असते असे मानले गेले . शिवाय समाजाची रूढीवादी मानसिकता अशी आहे की ,पुरुष नियम बनवतात आणि स्त्रिया अधीन असतात त्यांचे पालन त्यांना करावे लागते .

२ . राजकीय सहभागाचा सहभाग :-

महिलांना राजकारणाच्या क्षेत्रात रस नसतो आणि त्या घाणेरड्या खेळात उतरू इच्छित नाहीत .

३ . आर्थिक पारिस्थिती :-

राजकीय प्रेरणा घेण्यासाठी योग्य ज्ञान आणि समाजशास्त्रीय वातावरण असणे आवश्यक आहे .तसेच लोकांचा राजकीय सहभाग त्यांच्या कुटुंबाच्या आर्थिक परिस्थितीवर निश्चित केला जातो .

४ . घरातील कामे :-

महिलांना घरी खूप कामे असतात. एखाद्या राजकीय पक्षाचा भाग असणे म्हणजे त्या पक्षाप्रती समर्पण असणे . तथापि राजकीय पक्षाचे काम केल्यानंतर घरी येऊन काम करणे महिलांसाठी फार जिकिरीचे असते ,

५ . राजकीय ज्ञानाचा अभाव :-

काही महिलाना राजकीय सभागाचे महत्व समजत नाही आणि त्यांना ते माहीत नाही . त्यांना राजकारण कसे चालते ,राजकीय संस्था कक्षा काम करतात ,याचे पुरेसे ज्ञान नाही.

६ . राजकारणात हिंसचारची वाढ :-

अलीकडे राजकारणात गुन्हेगारीकरण,भ्रष्टाचार आणि असुरक्षेत लक्षणीय वाढ झाल्यामुळे स्त्रिया राजकारणातून बाहेर पडल्या आहेत . नेता हा पुरुष असावा या संजुतीमुळे महिला करत असलेल्या कठोर परिश्रमाना कमी लेखले जाते.

**सुरक्षतेचा अभाव :-**

घराबाहेर महिला असुरक्षातेचा अभाव हे महिला राजकारणापासून दूर राहण्याचे एक प्रमुख कारण आहे."५

भारतीय राजकारणात महिलांसमोरील आव्हाने :-

सध्यास्थितीत महिला आरक्षण कायद्यांमुळे महिलांचा राजकारणात सहभाग वाढला असला तरी महिलाना अनेक राजकीय आव्हानांना सामोरे जावे लागते . यामध्ये लिंगभेद आणि सामाजिक अपेक्षा अनेकदा त्यांच्या राजकीय कारकिर्दीत अडथळा आणतात. महिला राज्यकरण्यांना वारंवार अशा छाननी आणि टीकेला सामोरे जावे लागते. जेणेकरून हा सामना त्यांच्या पुरुष सहकाऱ्यांना करावा लागत नाही . याचे एक उत्तम उदाहरण म्हणजे दलीत नेत्या आणि उत्तर प्रदेशच्या माजी मुख्यमंत्री मायावती यांचा राजकीय प्रवास त्यांच्या लिंग आणि जातीशी संबंधित आव्हानांनी भरलेला आहे .

तसेच भारतातील राजकीय क्षेत्र बहुतेकदा पुरुषप्रधान आहे. त्यामुळे महिलांना लक्षणीय राजकीय अभाव मिळविणे कठीण होऊ शकते. स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये महिलांसाठी विशिष्ट टक्के जागा राखीव ठेवणारी कोटा प्रणाली ही या समस्येचे निराकरण करण्याच्या दिशेने आपली पाऊले पुढे टाकत आहे. तथापि त्यालाही काही अशी मर्यादा आहेत."६

**निष्कर्ष :-**

भारतीय राजकारणातील स्त्रियांच्या सहभागाचा विचार करता,अगदी प्राचीन काळापासून आजतागायत अनेक स्त्रीयणी राजकारणात सक्रिय सहभाग घेतल्याचे दिसून येते. मध्ययुगीन कालखंड तसेकहस्वतंत्र्यपूर्व कालखंड आणि स्वातंत्रीततोर काळखंदहतील अनेक स्त्रीयसाहभागी होऊन आपल्या कार्यकर्तुत्वचा ठसा भारतीय राजकारणावर उंटवलत्यामध्ये पहिल्या

महिला पंतप्रधान इंदिरा गांधी,पहिल्या महिला राष्ट्रपई प्रतिभटई पाटील,सोनिया गांधी ,सुषमा स्वराज्य,ममता बॅनर्जी,जयललिता ,मायावती इ. स्त्रीयणी आपल्या कार्यक्रतुटवणे भारतीय राजकारणात महत्वपूर्ण योगदान दिले.

भारतीय राजकारणात महिलानी अनन्य साधारण योगदान दिले असले तरी ह्या महिलाना अनेक आव्हानांना सामोरे जावे लागते . कुटुंब ,समाज यामध्ये आजही स्त्रियांना दुय्यम लेखले जाते त्यामुळे पुरुषप्रधान भारतीय समाजात महिलांना लिंगभेदाचा सामान्य करावा लागतो . त्यामुळे महिलांच्या कार्य कर्तुत्वाची फारशी दखल घेतली जात नाही.

**शिफारशी :-**

1. आपल्या कार्यकर्तृत्वाने स्त्रियांनी राजकारणात एक वेगळा ठसा उमटवला असला तरी अजूनही स्त्रियांनी लिंगभेदाचा सामना करावा लागतो . ती एक स्त्री आहे . यापेक्षा तिला माणूस म्हणून समाजात दर्जा प्राप्त झाल्यास महिला राजकारणात अधिक सकीय होतील .
2. आज महिलांनी राजकारणात स्वअस्तित्व निर्माण करूनही समाजाची मानसिक प्रवृती महिलांनी दुय्यम लेखण्याचीच आहे . त्यामुळे समाजाची मानसिक प्रवृती बदलल्यास स्त्रियांच्या राजकीय कर्तुत्वाला नक्की वाव मिळेल .
3. घटनेमध्ये वेळोवेळी दुरुस्त्या करून महिला आरक्षण कायदे केले असले तरी अजूनही ही आरक्षण अपुरे आहे . पुरेसे आरक्षण महिला राजकारणात अधिकाधिक सहभागी होतील .
4. गेल्या काही दशकामध्ये तुलनेने राजकारनात महिलांची टक्केवारी वाढली असली आणि त्या राज्यकरणामध्ये सहभागी झाल्या असल्या तरी पुरुषांच्या तुलनेत ही टक्केवारी फारच अल्प आहे . शिवाय राजकारणात स्त्रिया अजूनही सर्व राजकीय व्यवहार महिलांचे पती पहातात ह्याला कुठेतरी आळा बसल्यास स्त्रियांनी आपले बौध्दिक कौशल्य आणि कर्तृत्व दाखवण्यास निश्चितच संधी मिळेल .

**संदर्भ :-**

१ ) डोंगरे पाटील बी. व्ही ,महिलांचे राजकीय सक्षमीकरण,(लेख ) प्रकाशन ,जर्नल ऑफ इमरजिंग टेक्नॉलॉजी अँड इनॉवेटीव रिसर्च (जेईटीआयआर ) फेब्रुवारी -२०२२ वोललूयम -७ इश्यू -२ पृष्ठ .२

२)https://m-marathi.webdunia.com/article/independence-day-marathi/contribution-of-women-in-the-india-freedom-struggle-124081200044-1htm/?amp=1

3)https://www.linkedin.com/pulse/role-women-indian-politics-contributions-challenges-jatin-rathore-ozyuc

4 (https://www.orfonline.org/marathi/expert.speak/women-reservation-act)

5) https://biog.pleaders.in/women.politics-required-change/-

6)https://www.linkdin.com/pulse/role-women-indian-politics.contributions.challenges-jatin-rathore-ozyuc.